मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांना देखभाल-दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१९/प्र.क्र.४५/पापु-१९

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा माळा, नवीन इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ३० मार्च, २०१९

<u>वाचा</u>

१) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६
२) शासन निर्णय क्रमांक: मुपयो-२०१६/प्र.क्र.८३/पापु-१९, दिनांक २५ जानेवारी, २०१७
३) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.०१/पापु-१९, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दिनांक ०२.०४.२०१८

प्रस्तावना:-

राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस स्वच्छ आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रम प्रामुख्याने १) नव्याने घ्यावयाच्या नळ पाणीपुरवठा योजना, २) बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन व ३) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती या तीन प्रकारात राबविण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांना वितरीत करावयाचा देखभाल दुरुस्ती निधी प्रोत्साहनपर अनुदानाच्या स्वरुपात वितरीत करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२६.११.२०१८ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. वित्त विभागाने प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता रु.८.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचेमार्फ़त मुक्त व वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती (लेखाशिर्ष क्र.२२१५ ९९६२) या घटकाकरिता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेला रु.८.०० कोटी (अक्षरी रुपये आठ कोटी फ़क्त) इतका निधी आहरण व संवितरण अधिकारी (रोखशाखा), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोखशाखा) (श्री. पां. रा. खोटरे), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री.चेतन निकम), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोखशाखा) यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरित करुन ती पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी व तद्नंतर स्वतंत्र धनादेशाद्वारे सदर रक्कम पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी. पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर यांनी सदर रक्कम खालील सूचनांनुसार खर्च करावी.

I. या शासन निर्णयान्वये मंजूर व मुक्त करण्यात आलेल्या तरतूदीचे वाटप संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधित जिल्हा परिषदांना करण्यात यावे.

II. सदर अनुदानाच्या रकमेचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत. तसेच अनुदानाची रक्कम ज्याकरिता मंजूर व मुक्त करण्यात आली आहे, त्या प्रयोजनाकरिताच खर्च करावी.

III. सदर अनुदानातून वाटप होणा-या रकमेची माहिती संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी शासनाला वेळोवेळी सादर करावी.

IV. सदर अनुदानातून पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने केलेल्या खर्चाचे लेखे तपासणीचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर यांना देण्यात येत आहेत.

V. पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने प्राप्त अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे नियमितपणे शासनास सादर करावी. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी उपयोगिता प्रमाणपत्रात दर्शविलेल्या मंजूर व मुक्त अनुदानाच्या व खर्चाच्या रकमा प्रमाणित करुन स्वाक्षरीत कराव्यात.

VI. सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून विहित अहवाल विहित दिनांकास लेखा अधिकारी (पापु-२०), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई याच्याकडे सादर करावा.

VII. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच उक्त परिपत्रकान्वये आवश्यक असलेली प्रमाणपत्रे या विभागास सादर करण्यात यावीत.

३. या वितरीत केलेल्या अनुदानातून होणारा खर्च मागणी क्रमांक वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२)(२८) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती (२२१५ ९९६२)-३१, सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) (दत्तमत) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागवावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक ०२ एप्रिल, २०१८ रोजीच्या परिपत्रकातील परिच्छेद ७ मधील अटी व त्यासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. ८ मधील अ.क्र. १ ते १० मधील आवश्यक त्या बाबींची पूर्तता होत आहे. परिशिष्टातील अ.क्र. १ ते ७ येथील अटींचा संबंध येत नाही.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१४३५४९७२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ram Apparao Sabane

Digitally signed by Ram Apparao Sabane
DN: CN = Ram Apparao Sabane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2019.03.30 15:52:45 +05'30'

(रा. अ. साबणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्य मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१,
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
६) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) मुख्य /अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१०) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई
११) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद (सर्व).
१२) निवड नस्ती (पापु-१९)